भारत सरकार
विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# औद्योगिक विवाद (बँकव्यवसायी आणि विमाव्यवसायी कंपन्या) अधिनियम, १९४९

( १९४९ चा अधिनियम क्रमांक ५४ )

[ १ ऑक्टोबर, १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Industrial Disputes (Banking and Insurance Companies) Act, 1949

**( Act No. 54 of 1949 )**

[ As in force on 1st October, 1977 ]

संचालक, मुद्रण व लेखन सामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

(१९७८)

किमत १० पैसे

# औद्योगिक विवाद (बँकव्यवसायी आणि विमाव्यवसायी कंपन्या) अधिनियम, १९४९

## कलमांचा क्रम


कलम

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. व्याख्या.

३. [निरसित].

४. राज्य शासनांनी विवक्षित औद्योगिक विवादांच्या अभिनिर्णयासाठी, चौकशीसाठी किंवा मिटवणुकी-साठी निदशन करण्यास प्रतिषेध.

५. राज्य अधिकरणांपुढे प्रलंबित असलेल्या विवादांशी संबंधित कार्यवाहींचे अवसान आणि केंद्र शासनाने घटित केलेल्या अधिकरणांकडे अशा विवादांचे निर्देशन.

६. ज्या विवादांच्या बाबतीत निवाडे किंवा निर्णय झालेले आहेत ते फेरअभिनिर्णयासाठी निर्देशित करण्याबाबतच्या केंद्र शासनाच्या शक्ती.

७. १९४९ चा अध्यादेश २८ याचे निरसन.


एच-४८३३ (१०५५—८-७८)

## औद्योगिक विवाद (बँकव्यवसायी आणि विमाव्यवसायी कंपन्या) अधिनियम, १९४९

### (१९४९ चा अधिनियम क्रमांक ५४)

विवक्षित बँकव्यवसायी आणि विमाव्यवसायी कंपन्यांच्या संबंधातील औद्योगिक विवादांच्या अभिनिर्णयाबाबत उपबंध करण्यासाठी अधिनियम.

१४ डिसेंबर, १९४९]

ज्याअर्थी, एकापेक्षा अधिक राज्यांमध्ये शाखा किंवा अन्य आस्थापना असलेल्या बँकव्यवसायी आणि विमाव्यवसायी कंपन्यांच्या संबंधातील औद्योगिक विवादांच्या अभिनिर्णयाबाबत उपबंध करणे समयोचित आहे ;

त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :--

संक्षिप्त नाव व विस्तार.

१. (१) या अधिनियमास 'औद्योगिक विवाद (बँकव्यवसायी आणि विमाव्यवसायी कंपन्या) अधिनियम, १९४९' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार [1][जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून] संपूर्ण भारतभर आहे.

व्याख्या.

२. या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर, "निवाडा", "बँकव्यवसायी कंपनी", "औद्योगिक विवाद" आणि "विमाव्यवसायी कंपनी" या शब्दप्रयोगांना या अधिनियमाद्वारे विशोधित केलेले 'औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७' (१९४७ चा १४) याचे कलम २ यामध्ये नेमून दिल्याप्रमाणे ते ते अर्थ असतील.

३. [१९४७ चा अधिनियम क्रमांक १४-कलम २ चे विशोधन.] निरसन व विशोधन अधिनियम, १९५२ (१९५२ चा ४८)-कलम २ व पहिली अनुसूची या द्वारा निरसित.

राज्य शासनांनी विवक्षित औद्योगिक विवादांच्या अभिनिर्णयासाठी, चौकशीसाठी किंवा मिटवणुकीसाठी निर्देशन करण्यास प्रतिषेध.

४. अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन किंवा अशा शासनाला दुय्यम असलेला कोणताही अधिकारी किंवा प्राधिकरण यांनी कोणत्याही बँकव्यवसायी कंपनीच्या किंवा विमाव्यवसायी कंपनीच्या संबंधातील औद्योगिक विवाद किंवा अशा विवादाशी संबंधित असलेली कोणतीही बाब अभिनिर्णयासाठी, चौकशीसाठी किंवा मिटवणुकीसाठी कोणत्याही अधिकरणाकडे किंवा अन्य प्राधिकरणाकडे निर्देशित करणे विधिमान्य असणार नाही.

राज्य अधिकरणांपुढे प्रलंबित असलेल्या विवादांशी संबंधित कार्यवाहींचे अवसान आणि केंद्र शासनाने घटित केलेल्या अधिकरणांकडे अशा विवादांचे निर्देशन.

५. (१) राज्य शासनाने किंवा अशा शासनास दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा प्राधिकरणाने कोणत्याही बँकव्यवसायी किंवा विमाव्यवसायी कंपनीशी संबंधित असलेला कोणताही औद्योगिक विवाद किंवा अशा विवादाशी संबंधित अशी कोणतीही बाब कोणत्याही कायद्याखाली अभिनिर्णयासाठी किंवा मिटवणुकीसाठी कोणत्याही अधिकरणाकडे किंवा अन्य प्राधिकरणाकडे ३० एप्रिल, १९४९ या दिवसापूर्वी निर्देशित केली असेल आणि अशा निर्देशनाच्या संबंधात किंवा त्यामधून उद्भवणारी कोणतीही कार्यवाही त्या दिनांकाच्या लगतपूर्वी कोणत्याही अधिकरणापुढे किंवा अन्य प्राधिकरणापुढे प्रलंबित असेल त्याबाबतीत, अशा पूर्वोक्त दिनांकी असे निर्देशन मागे घेण्यात आलेले आहे असे मानण्यात येईल आणि अशा सर्व कार्यवाहींचे अवसान झालेले असेल.

(२) केंद्र शासन, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर होईल तितक्या लवकर लेखी आदेशाद्वारे, ज्याला पोटकलम (१) चे उपबंध लागू होतात असा प्रत्येक औद्योगिक विवाद उक्त अधिनियमाखाली घटित केलेल्या औद्योगिक अधिकरणाकडे उक्त अधिनियमाच्या कलम १० खाली अभिनिर्णयासाठी निर्देशित करील.

ज्या विवादाच्या बाबतीत निवाडे किंवा निर्णय झालेले आहेत ते फेरअभिनिणयासाठी निर्देशित करण्याबाबतच्या केंद्र शासनाच्या शक्ती.

६. (१) कोणत्याही बँकव्यवसायी किंवा विमाव्यवसायी कंपन्यांच्या संबंधातील कोणत्याही औद्योगिक विवादाच्या बाबतीत राज्य शासनाने घटित केलेल्या किंवा नियुक्त केलेल्या कोणत्याही अधिकरणाने किंवा प्राधिकरणाने किंवा अशा शासनाला दुय्यम असलल्या प्राधिकरणाने कोणताही निवाडा किंवा निर्णय दिलेला असेल त्याबाबतीत, उक्त निवाडा किंवा निर्णय अंमलात असला तरीही, केंद्र शासनास तो विवाद किंवा विवादातील कोणतीही बाब उक्त अधिनियमाच्या कलम १० खाली लेखी आदेशाद्वारे उक्त अधिनियमाखाली घटित केलेल्या औद्योगिक अधिकरणाकडे फेरअभिनिर्णयासाठी निदशित करता येईल आणि याप्रमाणे दिलेल्या निवाडयाची किंवा निर्णयाची अथवा अशा निवाडयाच्या किंवा निर्णयाच्या कोणत्याही भागाची अंमलबजावणी, ज्या औद्योगिक अधिकरणाकडे विवाद किंवा विवादातील कोणतीही बाब फेरअभिनिर्णयासाठी निर्देशित केलेली असेल ते अधिकरण आपला निवाडा सादर करीपर्यंत किंवा केंद्र शासनाला आवश्यक वाटेल इतक्या पुढील कालावधीपर्यंत स्थगित करता येईल.

---

१. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची याद्वारे दाखल करण्यात आले

(२) ज्या औद्योगिक अधिकरणाकडे तो विवाद किंवा विवादातील कोणतीही बाब फेरअभिनिर्णयासाठी याप्रमाणे निर्देशित करण्यात आली असेल त्या अधिकरणाने उक्त अधिनियमाच्या कलम १५-पोटकलम (१) खाली आपला निवाडा सादर केल्यानंतर केंद्र शासन, राज्य शासनाने घटित केलेल्या किंवा नियुक्त केलेल्या अधिकरणाने किंवा प्राधिकरणाने किंवा अशा शासनास दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा प्राधिकरणाने अशा विवादाच्या बाबतीत पूर्वी दिलेला निवाडा किंवा निर्णय किंवा आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल असा निवाडचाचा किंवा निर्णयाचा भाग प्रवर्तनात असण्याचे समाप्त होईल असे लेखी आदेशाद्वारे घोषित करू शकेल.

१९४९ चा अध्यादेश २८ याचे निरसन.

७. (१) 'औद्योगिक विवाद (बँकव्यवसायी आणि विमाव्यवसायी कंपन्या) दुसरा अध्यादेश, १९४९' (१९४९ चा २८) याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे किंवा त्याखाली प्रदान केलेल्या कोणत्याही शक्तीचा वापर करताना केलेली कोणतीही कृती किंवा केलेली कोणतीही कारवाई ज्या दिवशी केली गेली त्या दिवशी जणू काही हा अधिनियम अंमलात असावा त्याप्रमाणे या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून अशी कृती किंवा कारवाई करण्यात आली आहे असे मानले जाईल.

## THE INDUSTRIAL DISPUTES (BANKING AND INSURANCE COMPANIES) ACT, 1949

## औद्योगिक विवाद (बँकव्यवसायी आणि विमाव्यवसायी कंपन्या) अधिनियम, १९४९

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| adjudication | अभिनिर्णय | [S.4] |
| award | निवाडा | [S.2] |
| banking company | बँकव्यवसायी कंपनी | [S.2] |
| industrial dispute | औद्योगिक विवाद | [S.2] |
| Industrial Tribunal | औद्योगिक अधिकरण | [S.6(2)] |
| inquiry | चौकशी | [S.4] |
| Insurance company | विमाव्यवसायी कंपनी | [S.2] |
| refer | निर्देशित करणे | [S.4] |
| reference | निर्देशन | [S.4–m.n.] |
| settlement | मिटवणूक | [S.4] |

## औद्योगिक विवाद (बँकव्यवसायी आणि विमाव्यवसायी कंपन्या) अधिनियम, १९४९

## THE INDUSTRIAL DISPUTES (BANKING AND INSURANCE COMPANIES) ACT, 1949

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अभिनिर्णय | adjudication | [S.4] |
| औद्योगिक अधिकरण | Industrial Tribunal | [S.6(2)] |
| औद्योगिक विवाद | industrial dispute | [S.2] |
| चौकशी | inquiry | [S.4] |
| निर्देशन | reference | [S.4–m.n.] |
| निर्देशित करणे | refer | [S.4] |
| निवाडा | award | [S.2] |
| बँकव्यवसायी कंपनी | banking company | [S.2] |
| मिटवणूक | settlement | [S.4] |
| विमाव्यवसायी कंपनी | insurance company | [S.2] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई